# महिला व बाल कल्याण विभाग ,जिल्हा परिषद,गडचिरोली

**दुरध्वनी क्रमांक 07350536469**

**Email :icdscell@gmail.com**

## महिला समुपदेशन केंद्र सुरु करणबाबत जाहीरात

(शा.नि.क्र.झेडपीए २०१३/ प्र क्र. ७६/पंरा दि.२४ जानेवारी २०१४)

कुटुंबातील मारहान,लैगिक छळ व इतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदष्टया असंतूलित महिलांच्या सामाजिक,मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी ,महिला व बाल कल्याण विभाग ,जिल्हा परिषद,गडचिरोली च्या मार्फतीने सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात प्रकल्प कार्यालय सिरोंचा-१,एटापल्ली -१ व कुरखेडा -१ असे एकुण ३ महिला समुपदेशन केंद्र सुरु करावयाचे आहे त्यानुषंगाने स्वयेसेवी संस्थेमार्फत सदर केंद्र चालण्याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास दिनांक- २३/०५/२०२३ ते दिनांक ३ /०६/२०२३ पर्यंत सायंकाळी ४.०० वाजेपर्यत सादर करावे. या पुर्वीचे संस्थेला प्रस्ताव सादर करता येणार नाही.

सदर बाबतची सविस्तर जाहीरात व संबंधित अटी व शर्ती खालील प्रमाणे

१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्त्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.
२) नोंदणीकृत संस्था महिला समुपदेशन केंद्रांना किमाण १ ते ३ वर्षाचा कामकाजाचा अनुभव असावा.
३) मागील तीन वर्षाचा आडीट रिपोर्ट २०१९-२०२०,२०२०-२०२१,२०२१-२०२२
४) संस्थेचे स्वत:चे सुस्वच्छ कार्यालय असावे.
५) विधिसल्लागार या पदाकरीता शिक्षण पात्रता LLB आवश्यक आहे तसचे ५ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
६) समुपदेशकासाठी या पदाकरीता शिक्षण पात्रता MSW आवश्यक आहे तसचे किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
७) एक संस्थेला एकापेक्षा जास्त केंद्रे मंजूर करता येणार नाही.
८) समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्यासाची संस्थेची आर्थीक क्षमता असावी.
९) समुपदेशन केंद्रासाठी आवश्यक व्यसाहीक कौश्यल्य असणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग संस्थेकडे उपलब्ध असावा.
१०) विहीत नमुन्यातील अर्ज
११) संस्थेची संक्षिप्त माहीती.
१२) संस्थेच्या योजना व कार्यबाबतचा मागील ३ वर्षाचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल.
१३) संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापानाची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.
१४) संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याचाबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल,सांखिकी माहीतीसह .
१५) संस्थेचे मागील तीन महिन्याचे महिनानिहाय बँक स्टेटमेंटस
१६) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि मुंबई सार्वजनीक विषस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती जोडाव्यात.
१७) संस्थेची घटना व नियमावली ( घटनेत महिलांसाठी समुपदेशन केद्र चालविणे हा उददेश असावा.)ची साक्षांकित प्रत
१८) कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात .
१९) संस्थेचे वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाची छायाचित्र/कागदपत्रे/वृत्तपत्रातील कात्रणे जोडावी.
२०) संस्थेच्या कार्यरत पदाकरीता व कार्यकारणीची नाव / पत्ता /व्यवसाग व दुरध्वनी क्रमांकासह यादी जोडावी.
२१) संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकएकाचे नातेवाईक माहीती तसेच कोणीही सदस्य शासकिय सेवेत नसावे याबतचे हमीपत्र सांगत जोडावे.
२२) संस्थेच्या पदाधिका-याबाबत (अध्यक्ष व सचिव ) उप विभागीय पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीस विना दुराचार प्रमाणपत्र.
२३) संस्थेच्यानावने संस्थेबाबत जनसामान्याच्या तक्रारी नाहीत संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नाहीत,ठराव संस्थेने सार्वजनिक संमतीचा अपहार केलेला नाही याबाबत जिल्हाधिका-याचे प्रमाणपत्र.

व इतर तपाशिलाकरीता या कार्यालयाच्या www.zpgadchiroli.org या संकेतस्थळावरा संपर्क साधावा

इच्छुक संस्थांनी विहीत नमुन्यातील अर्जासाठी व योजनेच्या तपशिलावर माहीतीसाठी त्यांच्या जिल्हयाच्या महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,गडचिरोली यांचे शि संपर्क साधावा व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपला अर्ज परिपुर्ण प्रस्ताव प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या अनुक्रमणिकेसह प्रस्ताव ३ प्रतित सदरची जाहीरात प्रसिध्दी झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात या कार्यालयास सादर करावा.

सदर योजनेबावतचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या विभागाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद,गडचिरोली